**MHSN090004212024**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २०.०३.२०२४ |
| नोंदणी तारीख | : | २०.०३.२०२४ |
| निकाल तारीख | : | ११.०३.२०२६ |
| कालावधी | | वर्षे महिना दिवस |
| | | ०१ ११ २१ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव यांचे न्यायालयात**

(पिठासन अधिकारी श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)

**नियमित फौजदारी खटला क्र.७९/२०२४**

**निशाणी क्र.**

**महाराष्ट्र शासनतर्फे,** }
पोलीस निरीक्षक, तासगांव पोलिस ठाणे, } **–– अभियोगपक्ष**
तासगांव, जि.सांगली. }

**–– विरुध्द ––**

**१. सुनिता श्रीकांत सुर्यवंशी** }
वय – ५० वर्षे, व्यवसाय–शेती, }
**२. अशोक विलास सुर्यवंशी** }
वय – ४९ वर्षे, व्यवसाय–शेती, }
**३. सविता अशोक सुर्यवंशी** } **–– आरोपी**
वय – २४ वर्षे, व्यवसाय–शेती, }
**४. रोहन अशोक सुर्यवंशी** }
वय – २१ वर्षे, व्यवसाय–शेती, }
सर्व राहणार डोंगरसोनी, }
तालुका तासगांव, जि. सांगली. }

**भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२३, ३२४, ३२६, ३४१, ५०४ व ५०६ सह ३४ प्रमाणे.**

---

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ | : | श्रीमती एस. व्ही. पाटील. |
| आरोपींतर्फे विधिज्ञ | : | श्री. के. व्ही. पाटील. |

---

## न्या य नि र्ण य

(जाहीर दिनांक ११ मार्च २०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२३, ३२४, ३२६, ३४१, ५०४ व ५०६ सह ३४ प्रमाणे चालविणेत आला.

**अभियोगपक्षातर्फे थोडक्यात हकीकत अशी आहे की –**

२. दिनांक ०१.०६.२०२३ रोजी दुपारी २.०० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), त्याचे वडील दिनकर सुर्यवंशी, त्याचे चुलत चुलते गुलाब सुर्यवंशी (अ.सा.क्र.४) असे गट क्र. ७५७ मधील खरेदी घेत असलेल्या क्षेत्रातून पाणी जाण्यासाठी चर काढत होते त्यावेळी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) चा ट्रॅक्टर व संकेत झांबरे (अ.सा.क्र.३) व गुलाब सुर्यवंशी (अ.सा.क्र.४) चा ट्रॅक्टर कामासाठी घेतलेले होते. सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. २ तेथे आला व तो फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) ला म्हणाला की काम बंद करा व शेत आमचे आहे असे म्हणून आरोपी क्र. २ दिनकर सुर्यवंशी यांच्या अंगावर धावून गेला. त्यावेळी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) ने आरोपी क्र. २ ला सांगितले की काम बंद करतो, भांडू नका. त्यानंतर आरोपी क्र. २ ने संकेत झांबरे (अ.सा.क्र.३) व अभिजित ( अ.सा.क्र.२) यांना शिवीगाळ करुन ट्रॅक्टर घेवुन जाण्यास सांगितले. त्यावेळी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) ने काम बंद करुन दोन्ही ट्रॅक्टर बाहेर घेण्यास सांगितले व त्यानंतर आरोपी क्र.२ तेथुन निघुन गेला.

३. फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) हा त्याचा ट्रॅक्टर घेवुन घरी जात असतांना सायंकाळी ६.४५ वा.चे सुमारास श्रीकांत यशवंत सुर्यवंशी यांचे घरासमोरुन जात असतांना आरोपी क्र. २ व ३ यांनी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) चे ट्रॅक्टरवर दगड फेकले. आरोपी क्र. २ व ३२ यांनी अभिजित (अ.सा.क्र.२ ) चे ट्रॅक्टरजवळ येवुन चालू ट्रॅक्टरवरुन अभिजित (अ.सा.क्र.२) ला

खाली ओढून लाथाबुक्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. १ ने काठ्या आणून आरोपी क्र. २ ते ३ यांना दिल्या. आरोपींनी मिळुन फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२) यांना काठ्यांनी मारहाण केली. त्यावेळी दिनकर सुर्यवंशी, संकेत झांबरे (अ.सा.क्र.३), गुलाब सुर्यवंशी (अ.सा.क्र.४) व रणजित सुर्यवंशी (अ.सा.क्र.५) हे सोडवासोडव करणेसाठी आले असता आरोपींनी त्यांना धक्काबुक्की करुन शिवीगाळ करत आमचे शेतात यायचे नाही, नाहीरत एकेकाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली व आरोपी तेथुन निघुन गेले. सदरील मारहाणीत फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) चे पाठीवर, उजव्या मांडीवर, डाव्या खांद्यावर व मनगटाजवळ मुका मार लागला आहे. अभिजित (अ.सा.क्र.२) चे डोक्यात, उजव्या हाताला व खांद्याला दुखापत झाली आहे. दि. ०२.०६.२०२३ रोजी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) ने आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२३, ३२४, ३२६, ३४१, ५०४ व ५०६ सह ३४ प्रमाणे फिर्याद दाखल केली.

४. फिर्याद प्राप्त झाल्यानंतर गुन्हा नोंदणी क्र.२६०/२०२३ नोंदविला. सदर गुन्ह्याचा तपास श्री आर. बी. ओंबासे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, तासगांव पोलीस ठाणे यांना वर्ग केला. तपासी अधिकारी यांनी तपास करुन घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळाचा नकाशा काढला. तसेच गुन्ह्यातील हत्यार चाचर कळकाच्या काठ्या जप्त करुन जप्ती पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदविले. फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व जखमी अभिजित (अ.सा.क्र.२) यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे दाखल केली. तपासाअंती आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळून आल्याने आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२३, ३२४, ३२६, ३४१, ५०४ व ५०६ सह ३४ अन्वये मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

५. आरोपींना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२३, ३२४, ३२६, ३४१, ५०४ व ५०६ सह ३४ प्रमाणे दोषारोप वाचून समजावून सांगितला. आरोपींनी सदरील दोषारोप नाकारुन गुन्हा कबूल नाही असे सांगितले आणि

संपरिक्षेची मागणी केली.

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्दचे गुन्हे शाबीत करणेसाठी फिर्यादी साक्षीदार क्र.१ इंद्रजित दिनकर सुर्यवंशी यांची साक्ष (नि.३१), जखमी साक्षीदार क्र.२ अभिजित गुलाब सुर्यवंशी यांची साक्ष (नि.३२), साक्षीदार क्र. ३ संकेत अशोक झांबरे यांची साक्ष (नि.३३), साक्षीदार गुलाब निवृत्ती सुर्यवंशी यांची साक्ष (नि.३४) व साक्षीदार क्र. ५ रणजित दिनकर सुर्यवंशी यांची साक्ष (नि.३५) प्रमाणे नोंदविली.

७. अभियोगपक्षाच्या पुराव्यात आरोपींविरुध्द पुरेसा पुरावा मिळुन न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविले नाही. आरोपींनी त्यांच्या बचावात कोणताही पुरावा दाखल केला नाही.

८. प्रस्तुत प्रकरणातील तथ्ये व अभिलेखावरील पुरावा यानुसार माझ्या निष्कर्षास खालील वादप्रश्न उपस्थित झाले. सदरील वादप्रश्न व त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, दि.०१.०६.२०२३ रोजी सायंकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास डोंगरसोनी, ता.तासगांव, जि.सांगली येथे श्रीकांत यशवंत सुर्यवंशी यांच्या घरासमोर, आरोपींनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२) यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली? | **नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देश | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| | साध्य करणेकरिता, सर्व आरोपींनी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२) यांना घातक हत्यार काठ्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहचविली ? | |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, सर्व आरोपींनी अभिजित (अ.सा.क्र.२) यांना घातक हत्यार काठ्यांनी मारहाण करुन इच्छापूर्वक गंभीर दुखापत पोहचविली ? | **नकारार्थी** |
| ४. | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, सर्व आरोपींनी फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२) यांना गैरपणे निरुध्द केले? | **नकारार्थी** |
| ५ | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोंपीनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), संकेत (अ.सा.क्र.३), गुलाब (अ.सा.क्र.४) व रणजित (अ.सा.क्र.५) यांचा उद्देशपूर्वक अपमान करुन ज्यायोगे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग किंवा अन्य कोणताही अपराध घडेल असे कृत्य केले? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ६ | अभियोगपक्ष शाबीत करतो का, वरील तारीख, वेळी व ठिकाणी, आरोपीनी त्यांचे समान उद्देश साध्य करणेकरिता, फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), संकेत (अ.सा.क्र.३), गुलाब (अ.सा.क्र.४) व रणजित (अ.सा.क्र.५) यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केला? | **नकारार्थी** |
| ७. | आदेश कोणता ? | **आरोपींना निर्दोषमुक्त केले.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

९. अभियोगपक्षातर्फे विधिज्ञ श्रीमती एस. व्ही. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर दाखल केला आहे. सदरील पुराव्यांवरुन आरोपींनी गुन्हा केलेचे शाबीत होते त्यामुळे आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देणेत यावी.

१०. आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.के. व्ही. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, आरोपींनी कोणताही गुन्हा केलेला नाही. फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), संकेत (अ.सा.क्र.३), गुलाब (अ.सा.क्र.४) व रणजित (अ.सा.क्र.५) व आरोपींमध्ये मे.न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेली आहे त्यामुळे फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), संकेत (अ.सा.क्र.३), गुलाब (अ.सा.क्र.४) व रणजित (अ.सा.क्र.५) यांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर आणलेला नाही त्यामुळे आरोपीं निर्दोषमुक्त होणेस पात्र आहेत.

### <u>वादप्रश्न क्र.१ ते ६</u>–

११. वादप्रश्न क्र.१ ते ६ हे एकमेकांशी संलग्न असल्याने त्यांच्या निष्कर्षाचे कारणमिमांसेचा विचार एकाचवेळी करणेत आला.

फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), संकेत (अ.सा.क्र.३), गुलाब (अ.सा.क्र.४) व रणजित (अ.सा.क्र.५) यांनी अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. अभियोगपक्षाने सदरील साक्षीदारांना उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतू, अभियोगपक्षास सदरील साक्षीदारांच्या पुराव्यातून आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा मिळून आला नाही. त्यामुळे याकामी फिर्याद शाबीत झाली नाही. फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व आरोपीं त्यांचेत मे.न्यायालयाबाहेर आपसात तडजोड झालेबाबत पुरशीस (नि.३९) अभिलेखावर दाखल केली आहे. आरोपींनी घटनास्थळ पंचनामा (नि.३६), फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) व अभिजित (अ.सा.क्र.२) यांची वैद्यकिय प्रमाणपत्रे (नि.३७ ते ३८) मान्य केली आहेत. फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१) ने त्याला पूढील साक्षीदार तपासावयाचे नाहीत अशी पुरावा बंद पुरसीस (नि.४०) दाखल केली आहे.

१२. अभियोगपक्षातर्फे दाखल केलेल्या पुराव्यांवरुन असे दिसून येते की, फिर्यादी इंद्रजित (अ.सा.क्र.१), अभिजित (अ.सा.क्र.२), संकेत (अ.सा.क्र.३), गुलाब (अ.सा.क्र.४) व रणजित (अ.सा.क्र.५) व आरोपीमध्ये मे.न्यायालयाबाहेर आपसांत झालेल्या तडजोडीमुळे साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही त्यामुळे अभियोगपक्ष आरोपींविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा अभिलेखावर दाखल करु शकला नाही. अभियोगपक्षाने तपासलेले साक्षीदार व दाखल केलेले पुरावे हे अपुरे व संदिग्ध असल्याने तथाकथित घटना घडली किंवा कसे याबाबत संशय निर्माण करतात. अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरल्याने मी वादप्रश्न क्र.१ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविते.

**वादप्रश्न क्र.७ –**

१३. वरनमूद चर्चा, निरीक्षण आणि निष्कर्ष पाहता अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला त्यामुळे आरोपीं निर्दोषमुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी वादप्रश्न क्र.७ चे निष्कर्षादाखल

खालील आदेश पारीत करते –

**<u>आ दे श</u>**

(१) आरोपी क्रमांक १ सुनिता श्रीकांत सुर्यवंशी, क्र.२ अशोक विलास सुर्यवंशी, क्र.३ सविता अशोक सुर्यवंशी व क्र. ४ रोहन अशोक सुर्यवंशी यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२३, ३२४, ३२६, ३४१, ५०४ व ५०६ सह ३४ प्रमाणे निर्दोषमुक्त केले.

(२) आरोपींचे वैयक्तीक जातमुचलके (बंधपत्रे) व जामीनकदबे रद्द केले.

(३) आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/– चे जामीनकदबा व वैयक्तीक बंधपत्र द्यावे.

(४) जप्त मुद्देमाल चार कळकाच्या काठ्या अपिल कालावधीनंतर नाश करण्यात याव्यात.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला)

BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Digitally signed by BHANUPRIYA RAHUL AVACHARI DURGAWADE
Date: 2026.03.13 13:42:27 +0530

ठिकाण – तासगांव
दिनांक – ११.०३.२०२६

**(श्रीमती बी.आर.आवचारी दुर्गवडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, तासगांव